| | | |
|---|---|---|
| MHWS080002392010 | प्राप्त दिनांक – | १२.०१.२०१० |
| | नोंदणी दिनांक – | १२.०१.२०१० |
| | निकाल दिनांक – | १६.०३.२०१६ |
| | कालावधी – | **१६ व. ०२ म. ०४ दि.** |

**<u>प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी(कोर्ट नं. ३), रिसोड यांचे न्यायालयात</u>**

**<u>(समक्षः श्री किरण दि. लुकडे)</u>**

**<u>नियमित फौजदारी खटला क्र. ०६/२०२६</u>** **<u>अपराध क्र. ३८/१९९९</u>**

**जुना नं. फौ. कि. अर्ज .क्र. ०५/२०१०** **<u>निशाणी क्र. १७</u>**

महाराष्ट्र शासन मार्फत,

पोलीस स्टेशन अधिकारी,

पोलीस स्टेशन, रिसोड **....फिर्यादी**

**....विरुध्द....**

प्रमिला उर्फ कमल उर्फ विमल पांडुरंग ठाकरे

वयः ६१ वर्षे, व्यवसायः मजुरी

रा. गाडगे नगर डॉ. भांबुरकर यांचे

दवाखाण्यामागे तापडीया नगर अकोला.

**....आरोपी**

**दोषारोपः <u>गुन्हा कलम ४२० भा.दं.वि. प्रमाणे</u>**

---

**श्री. श्री. एम.डी.अडकिने. सरकारी अभियोक्ता**

**आरोपी फरार असल्यामुळे फौ.प्र.सं. कलम २९९ प्रमाणे संपरिक्षा**

---

## भाग– 'ब'

| अनु.क्र. | विवरण | दिनांक |
|---|---|---|
| ०१. | गुन्हा घडल्याचा दिनांक | ०७.०९.१९९८ |
| ०२. | प्रथम खबर अहवाल दिनांक | ०९.०४.१९९९ |
| ०३ | दोषारोपपत्र दाखल झाल्याचा दिनांक | २६.०५.२००० |
| ०४. | दोषारोप निश्चिती दिनांक | - |
| ०५. | पुरावा सुरू झाल्याचा दिनांक | ०५.०१.२०२६ |
| ०६. | न्यायनिर्णय राखीव केल्याचा दिनांक | --- |
| ०७. | न्यायनिर्णयाचा  दिनांक | १६.०३.२०२६ |
| ०८. | निकाल सुनावनीचा दिनांक | १६.०३.२०२६ |

## आ रो पी चा त प शि ल

| अनु. क्र. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामीन दिनांक | गुन्हा कलम | निर्दोष किंवा दोषी | सुनावलेली शिक्षा | फौ.प्र.सं कलम ४२८ अंतर्गत भोगलेली शिक्षा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | प्रमिला उर्फ कमल उर्फ विमल पांडुरंग | दि. १०.०४.२००३ | ११.०५.२००३ | भा.दं.वि. ४२० प्रमाणे | निर्दोष | — | — |

## न्यायनिर्णय
## (पारित दिनांक १६.०३.२०२६)

प्रस्तुत प्रकरणात आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान कलम ४२० अन्वये अपराध केले बाबत खटला चालविण्यात आला.

**०२** अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत अशी की, फिर्यादी मुन्नाप्रसाद बकटप्रसाद तिवारी (यानंतर केवळ फिर्यादी म्हणून संबोधण्यात येते) हे रिसोड येथील

रहिवाशी आहेत. फिर्यादी यांची बहिण कमल तिवारी ही बालाजी विद्यालय केशवनगर ता. रिसोड जि. वाशिम या माध्यमिक शाळेवर शिक्षिका म्हणून काम करते. फिर्यादी यांच्या बहिणीला दोन मुले आहेत. आरोपी प्रमिला पांडुरंग ठाकरे हया नेहमी बालाजी विद्यालयावर कुटे सर यांच्या कडे येत असत आरोपी समाजकार्यातील अपंग मुलामुलीचे शिष्यवृत्तीचे काम करित असत. त्यामुळे आरोपीची व फिर्यादीची ओळख झाली त्या ओळखीतुन आरोपी यांनी फिर्यादी यांच्या बहिणीची मुलीचा नागपूर येथील डी.एड कॉलेजला नंबर लावण्याकरिता मुक बधिर विद्यालय शंकर नगर येथील प्रक्षिशणास लावून देते त्यासाठी दहा हजार रूपये खर्च लागेल. त्या करिता सात हजार रूपये फिर्यादी यांनी आरोपीला दिले. आरोपीने फिर्यादीला सांगितले की, फिर्यादी यांची बहिणीची मुलगी वैशाली हिचा डी. एड. ला नंबर लागल्यानंतर तीन हजार रूपये व नागपूरला जाण्यायेण्याकरिता दोन हजार रूपये असे पाच हजार रूपये लागतील. असे सांगितले परंतू नागपूर येथे गेल्यानंतर फिर्यादी यांच्या लक्षात आले आरोपीने पैसे वगैरे भरलेले नाही तसेच डी.एड साठी नंबर लागला नाही असे समजले त्यावर फिर्यादी यांना समजले की त्यांची फसवणूक झाली. म्हणून त्यांनी आरोपीच्या विरोधात पोलिस स्टेशन रिसोड येथे रिपोर्ट दिला. अशा फिर्यादीच्या रिपोर्ट वरून पो.स्टेला अप नं. ३८/१९९९ कलम, ४२० भा.दं.वि चा गुन्हा दाखल करून तपासात केला. तपासादरम्यान पोलिसांनी घटनास्थळ पंचनामा, साक्षीदारांची बयाण नोंदवले तपासाअंती आरोपीने गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

<u>०३</u> प्रकरणात आरोपी दोषारोप निश्चीतीकरीता संपरिक्षेदरम्यान हजर नसल्याने त्याचे वेळोवेळी समन्स व वारंट काढण्यात आले. तरीही आरोपी मिळून न आल्याने व तो दिलेल्या पत्त्यावर रहात नसल्याचा अहवाल आल्याने आरोपीविरुध्द फौ.प्र.सं.कलम ८२ नुसार जाहिरनामा काढण्यात आला. जाहिरनामा व उदघोषणा बजावूनही आरोपी हजर झाला नाही. त्यानंतर फौ.प्र.सं.कलम २९९ प्रमाणे साक्षीदारांना साक्षसमन्स काढण्यात आले. अभियोगपक्षाने एकूण ०१ साक्षीदारांना तपासले. प्रकरण जुने असल्याने अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. आरोपीविरुध्द गुन्ह्यात गोवणारा कोणताही पुरावा न आल्याने आरोपीचे फौजदारी प्रक्रीया संहितेच्या कलम ३१३(१)(ब) अंतर्गत जबाब नोंदविण्यात आले नाही.

**<u>०४</u>** अभियोग पक्षाचा युक्तीवाद ऐकला. निर्णयासाठी उपस्थित झालेले व त्याचे निष्कर्ष कारणमिमांसेसहित मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| ०१. | दिनांक ०७.०९.१९९८ रोजी ग्राम रिसोड येथे आरोपीने फिर्यादी यांच्या बहिणीच्या मुलीला डी.एड कॉलेज नागपूर येथे दाखला करून देतो म्हणून दहा हजार रूपये घेवून वाईट उद्देशाने फसवणूक केली, म्हणुन भा.द.वि कलम ४२० प्रमाणे गुन्हा केला ? | नाही. |
| ०२. | आदेश काय ? | ...आरोपी विनादोषारोपमुक्त. |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्दे क्र. ०१ करीताः</u> –**

**<u>०५</u>** अभियोगपक्षाने साक्षीदार क्र. ०१ साक्षीदार कल्पना महावीर दिक्षीत उर्फ कल्पना रमेश प्रसाद तिवारी यांना नि.क्र.१२ वर तपासले.

**<u>०६</u>** साक्षीदार क्र. ०१ साक्षीदार कल्पना महावीर दिक्षीत उर्फ कल्पना रमेश प्रसाद तिवारी यांनी साक्ष दिली की, ते आरोपीला ओळखत नाही. त्या फिर्यादीला ओळखतात. फिर्यादी हा त्यांचा भाउ आहे. फिर्यादी यांचा सन २०१० मध्ये मृत्यू झालेला आहे. घटना ही १९९८ –१९९९ ची आहे. त्यांना घटने बाबत काहीही माहिती नाही. त्यांनी सांगितले की, त्यांच्या मुलीला नोकरी लावून देतो म्हणून कधीही कोणीही पैशाची मागणी केली नव्हती. तसेच त्यांनी कधीही कोणाला नोकरी लावण्यासाठी पैसे दिले नव्हते. वरील साक्षीदार हे अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्याने सर्व साक्षीदारांना फितूर घोषित करुन उत्तरसूचक प्रश्न विचारण्यात आले असता सर्व साक्षीदारांनी नकारार्थी उत्तरे दिली.

**<u>०७</u>** अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रकरण फार

जुने आहे. कलम ३५६ भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ नुसार भारतीय नागरिक सुरक्षा संहितेमध्ये किंवा इतर कोणत्याही कायद्यामध्ये काही असले तरी, जेव्हा फरारा घोषित आरोपी, संयुक्तिपणे आरोपी असो वा नसो, आरोपी खटल्यापासून वाचवण्यासाठी फरार झालेला असेल आणि त्याला अटक होण्याची तात्काळ शक्यता नसेल, तेव्हा अशा आरोपीचा प्रत्यक्ष उपस्थित राहण्याचा आणि खटला चालवण्याचा अधिकार सोडून देण्यात आला आहे असे मांडले जाईल आणि न्यायालय न्यायाचे हिताकरिता लेखी कारणे नोंदवल्या नंतर खटला खटल्याची प्रक्रिया त्याचपध्दतीने आणि त्याच परिणामाने चालू ठेवेल जसे की, आरोपी सदरील प्रकरणामध्ये उपस्थित राहून त्याचा सहभाग नोंदवत आहे आणि न्यायालय सदरील आरोपीच्या अनुउपस्थितीमध्ये न्यायनिर्णय पारित करू शकेल.

<u>०८</u> सदरील प्रकरणातील आरोपी हाफरार असल्याने तो मिळून आला नसल्याने त्याचा जाहिरनामा काढल्यानंतर फौ.प्र.सं.कलम २९९ प्रमाणे संपरिक्षा चालवून साक्षीदारांचा पुरावा नोंदविण्यात आला. प्रकरण फार जुने असून मा. वरिष्ठ न्यायालयाच्या सुचनानंप्रमाणे जुने प्रकरणे तत्परतेने निकाली काढण्याचे निर्देश देण्यात आले आहे. पटलावर आरोपीविरुध्द सबळ पुरावा न आल्याने व अभियोग पक्ष इतर साक्षीदारांना पुरावा देण्याकरीता न्यायालयात हजर न करु शकल्याने अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

<u>०९</u> अभिलेखाचे एकंदरीत अवलोकन केले असता असे दिसून येते की, फिर्यादी यांच्या बहिण सा. क्र. १ साक्षीमध्ये आरोपीविरोधात त्यांना गुन्हयात गोवणारा कोणताही पुरावा आलेला नाही. फिर्यादी यांनी त्यांच्या साक्षीमध्ये आरोपी व त्यांच्यामध्ये पैशाच्या देवाण घेवाण झाल्याबाबत नाकारले. फिर्यादी यांचा मृत्यू हा सन २०१० मध्ये झाले असल्याचे सांगितले तसेच प्रत्यक्षदर्शी साक्षीदार दिनकर कुटे यांचाही मृत्यू झाल्याबाबत नि. क्र. ०९ वर त्यांचे मृत्यूप्रमाण पत्र आहे. वरील पुरावा पाहता अभियोग पक्षाने भादवी कलम ४२० खालील गुन्हे संश्यापलीकडे सिध्द केले नाहीत. तसेच तपासलेल्या फिर्यादी आरोपीविरुध्द तक्रार नसून त्यांना प्रकरण पुढे चालवणे नाही. त्यामुळे अभिलेखावर

आलेल्या तोंडी पुराव्यावरुन आरोपीविरुध्द लावलेले आरोपी सिध्द होत नाहीत. तसेच आरोपी जरी दोषारोप निश्चीतीनंतर फरार असला तरी त्याच्याविरुध्द अभिलेखावर कोणताही पुरावा आलेला नसल्याने विनाकारण प्रकरण प्रलंबित ठेवणे, योग्य होणार नाही. त्यामुळे आरोपीला दोषमुक्त करणे, योग्य व न्यायोचीत ठरेल.

**१०** सबब अभिलेखावर आलेल्या साक्षीदारांच्या साक्षीवरुन असे निर्विवादपणे निष्पन्न झाले नाही की, नमूद वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीची बहिणीची मुलगी हिला डी.एड ला नंबर लावून देतो म्हणून फसवणूक केली, म्हणुण मी मुद्दा क्र. ०१ चे उत्तर नकारार्थी देऊन मुद्दा क्र. ०२ च्या उत्तराकरीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

**०१.** आरोपी प्रमिला उर्फ कमल उर्फ विमल पांडूरंग ठाकरे **(फरार)** यास अपराध क्र.३८/१९९९ पो.स्टे.शिरपूर अन्वये कलम कलम ४२० या गुन्हयातून शिक्षेस पात्र असलेल्या अपराधातून विनादोषारोपमुक्त (Discharged) करण्यात येत आहे.

**०२.** फरार आरोपीविरुध्द कायम पकड वारंट किंवा जाहीरनामा प्रलंबित असल्यास ते परत बोलविण्यात यावे.

**०३.** आरोपीचे जामीनपत्र रद्द करण्यात येत आहेत.

(सदरहू न्यायनिर्णय खुले न्यायालयात जाहीर केला.)

**स्वा/-**
(**श्री किरण दि. लुकडे**)
दिनांकः १६.०३.२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,रिसोड.

**भाग-क**
**( फौजदारी नियमावली प्रकरण ०६ कलम ४४(iii) नुसार )**
**सा क्षी दा रां ची या दी**

**(अ) अभियोगपक्ष/सरकार पक्ष –**

| अनु.क्र. | साक्षीदारांची नावे | निशाणी | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|---|
| ०१. | कल्पना महावीर दिक्षीत उर्फ कल्पना रमेश प्रसाद तिवारी | १२ | फिर्यादी यांची बहिण |

**(ब) बचाव पक्षाचे आणि (क) न्यायालयीन साक्षीदार असतील तर–**

| अनु.क्र. | नांव | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| ०१. | — | — |

## कागदपत्रांची यादी न्यायालय निशाणी क्रमांक

**(ड) अभियोग पक्ष**

| अनु.क्र. | कागदपत्रे | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| ०१. | फिर्यादी यांचे मृत्यूप्रमाण पत्र | ०८ |
| ०२. | साक्षीदार दिनकर यांचे मृत्यूप्रमाणपत्र | ०९ |
| ०३. | फौ.प्र.सं. कलम ३१३ प्रमाणे जबानी | निरंक |

**(इ) साहित्य वस्तू–**

| अनु.क्र. | साहित्य वस्तू क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| ०१. | ------ | ------- |

स्वा/-
**(श्री किरण दि. लुकडे)**
दिनांकः १६.०३.२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,रिसोड.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | S.M. Pandit |
| Name of court | : | 2nd jt C.J.J.D.& JMFC;Risod |
| Date | : | 04.02.2026 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer | : | 04.02.2026 |
| Judgment/Order uploaded on | : | 04.02.2026 |